

| वर्ष - 7 | अंक - 208 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 6 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- कोण आहे मल्लिका सागर?
- औरों में कहां दम थाची रिलीज डेट जाहीर
- शिंदे समितीचा आज हैदराबाद दौरा!
- हा तर अमृतकाळातील पूर्वरंगाचा

## ‘एलपीजे इनोव्हेशन अवार्ड्‌स-2024’ ची घोषणा

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला ‘व्यासपीठ’!

### » लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप कला-क्रीडा अकादमीचा उपक्रम

। पिंपरी । महाईन्यूज ।

**लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी त्यांच्या संकल्पनेतील ‘विकसित पिंपरी-चिंचवड’ शहर कसे असावे? याची रूपरेखा तयार केली होती. त्यांच्या कल्पनेतील तेच आदर्श शहर साकारण्यात भावी पिढीचा सहभाग असावा आणि या नव्या पिढीतील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशातून लक्ष्मणभाऊ जगताप कला आणि क्रीडा अकादमीने ‘एलपीजे इनोव्हेशन अवॉर्ड्स-२०२४’ ची घोषणा केली आहे.**



> उद्योगनगरी म्हणून लौकिक असलेले पिंपरी-चिंचवड शहर भविष्यात उत्तम संकल्पनांचे आणि कल्पकतेचे शहर म्हणून ओळखले जावे. या करिता ‘एलपीजे इनोव्हेशन अवॉर्ड्स-२०२४’ ची घोषणा केली आहे. शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. आगामी काळात शहराच्या शाश्वत विकासामध्ये नागरिक, विद्यार्थ्यांच्या कल्पकतचे योगदान महत्त्वपूर्ण राहील. त्याद्वारे शहरवासीयांची जीवनशैली उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येतील, असा विश्वास आहे.
>
> **–शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.



विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या स्पर्धेचे भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आयोजन केले आहे. या स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांपासून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सहभागी होता येणार आहे. स्पर्धेतील विषयांची रचना पाहता या स्पर्धेतून पुढे येणाऱ्या संकल्पना शहराच्या शाश्वत विकासासाठी पुरक ठरणार आहेत.

सदर स्पर्धा तीन श्रेणीमध्ये असतील. सातवी ते नववीच्या विध्यार्थ्यांसाठी उप कनिष्ठ श्रेणी, दहावी ते बारावीच्या विध्यार्थ्यांसाठी कनिष्ठ श्रेणी आणि पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वरिष्ठ श्रेणी असेल. स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी असली, तरी या निमित्ताने पालक आणि शिक्षकांच्या मनातील संकल्पनाही विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नक्कीच मांडल्या जाऊ शकतात. एका अर्थाने संपूर्ण शहरातील नागरिकांना त्यांच्या स्वप्नातील शहर साकारण्यासाठी उत्तमोत्तम संकल्पना मांडण्याची संधी या स्पर्धेच्या निमित्ताने मिळणार आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेतील विजेत्यांना वैयक्तिक आणि सांघिक अशी एकूण ७ लाख रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत.

स्पर्धेसाठीची नोंदणी दि. ५ डिसेंबर २०२३ रोजी सुरु होत असून, नोंदणीचा अंतिम दिनांक ३ जानेवारी २०२४ ही असेल. सदर संकल्पनांचे मूल्यमापन तज्ज्ञ परीक्षकांकडून दि. २० जानेवारी २०२४ रोजी करण्यात येईल व स्पर्धेची अंतिम फेरी दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी पार पडेल. सहभागी होण्यासाठी www. LPJFOUNDATION.COM या वेबसाइटवर प्रोजेक्ट सबमिट करावा व अधिक माहितीसाठी 8956002507/ 8956002508/ 8956002509 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेत सादर होणाऱ्या सर्व संकल्पनांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी वार्डनिहाय सर्वोत्तम संकल्पना निवडण्यात येतील तसेच शहरा विकासासाठी साहाय्यभूत ठरतील अशा सर्वोत्तम संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी व या संकल्पनेचे ‘पेटंट’ स्पर्धकाला मिळवून देण्यासाठीही आवश्यक सहकार्य करण्यात येईल.

### या विषयांवर कल्पकता सादर करा!

» **१- शाश्वत स्मार्ट सिटी:** यामध्ये कचरा व्यवस्थापन, शहरी गतिशीलता, रहदारी, पायाभूत सुविधा, आपत्ती सुसज्जता, जल व्यवस्थापन आणि संवर्धन, सार्वजनिक उपयोगिता आणि सेवा सुलभता, सर्वसमावेशक सेवा वितरण (सर्व विभाग/लिंग) असे उपविषय समाविष्ट आहेत.

**२- डिजिटलायझेशन :** ॲप्स आणि प्लॅटफॉर्म, आयसीटी (माहिती संप्रेषण आणि तंत्रज्ञान), ई-गव्हर्नन्स, ई-नागरिक सेवा वितरण, तक्रार निवारण, आयएमसी वेबसाइट, पीसीएमसी/सारथी ॲप असे यातील उपविषय आहेत.

**३- पर्यावरण:** प्रदूषण नियंत्रण, ऊर्जा आणि संसाधने, हरित पट्टे. असे उपविषय आहेत.

**४- महसूल :** महसूल स्रोत, खर्च, सर्वोत्तमीकरण असे यातील उपविषय आहेत.

**५- नागरी आरोग्य आणि निरोगीपणा:** यामध्ये आरोग्य सेवा सुलभता, स्वच्छता, मानसिक आरोग्य, सजगता हे उपविषय आहेत.

**६- संस्कृती आणि वारसा:** सांस्कृतिक वारसा स्थळांचे जतन व संवर्धन असे उपविषय आहेत.

## पोलिसांचे देहू-आळंदीत लक्ष अन् चोरट्यांचा शहरात धुमाकूळ!

### » भोसरी आणि सांगवी परिसरात दोन ठिकाणी दागिने हिसकावले

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी एकादशी निमित्त पिंपरी चिंचवड पोलिसांनी संपूर्ण लक्ष आळंदी आणि देहू या दोन तीर्थक्षेत्रांवर केंद्रीत केले आहे. शहरातील पोलिसांचे लक्ष देहू आळंदीत लागले असल्याचे दिसतात शहरातील चेन चोरटे सक्रिय झाले. चोरट्यांनी मंगळवारी (दि. 5) सकाळी भोसरी आणि सांगवी परिसरात दोन ठिकाणी दागिने हिसकावले.

संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने लाखो भावी आळंदी येथे दाखल होत आहेत. वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पिंपरी चिंचवड पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला आहे. पोलीस वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी तैनात असतानाच शहरात चोरट्यांनी धुमाकूळ सुरू केला.

कासारवाडी ते रेल्वे स्टेशन रस्त्यावर सकाळी सव्वासहाच्या सुमारास एक महिला मॉर्निंग वॉक करत होत्या. त्यावेळी दुचाकीवरून आलेला दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील गंठण हिसका मारून चोरून नेले. महिलेने आरडाओरडा केला. मात्र, चोरटे



गंठण घेऊन पसार झाले. याप्रकरणी 33 वर्षीय महिला (रा. केशवनगर, कासारवाडी) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# पाच हजार घरांसाठी 60 हजार अर्ज

## पुणेकरांची म्हाडाच्या घराला भरपूर प्रमाणात पसंती

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे म्हाडाच्या घरासाठी यंदा भरपूर प्रमाणात (PUNE MHADA) अर्ज प्राप्त झाले आहेत. पुण्यातील 5 हजार 863 घरांसाठी 59 हजार 350 ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे यंदा पुणेकरांनी म्हाडाच्या घराला भरपूर प्रमाणात पसंती दिल्याचं दिसून येत आहे.**




त्यासोबत सर्व सामान्य नागरिकांना स्वतःचे घर उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत असून येत्या वर्षभरात विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत सुमारे 1 लाख कुटुंबांना हक्काचे घर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असं गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी म्हटलंय. सावे म्हणाले, नागरिकांच्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सर्वांसाठी घरे' देण्याची संकल्पना मांडली. त्यानुसार राज्य आणि केंद्र शासन मिळून प्रधानमंत्री आवास योजनांसारख्या विविध योजनांच्या माध्यमातून नागरिकांना हक्काची घरे उपलब्ध करुन दिली जात आहेत. पुणे म्हाडाच्या आजच्या सोडतीत उपलब्ध सदनिकांच्या तुलनेत सुमारे दहापटीने अर्ज प्राप्त झाले. सदनिकांसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात अर्ज करुन म्हाडावर विश्वास दाखविल्याबद्दल त्यांनी नागरिकांना धन्यवाद दिले. म्हाडाच्यावतीने नागरिकांना 5 लाख 14 हजार घरे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. म्हाडाची सोडत प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून अतिशय पारदर्शक आहे, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. मुंबईतील सुमारे 15 हजार गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत विविध प्रकल्प उभारण्यात येत आहे. आगामी काळातही विविध उत्पन्न गटातील नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. यापुढे घरांची सोडत वर्षातून दोन वेळेस घेण्यासाठी म्हाडानी प्रयत्न करावेत. 20टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत अधिकाधिक नागरिकांना परवडणारी घरे देण्यासाठी प्रयत्न करावेत. पुणे विभागात विविध गृहनिर्माण योजनेकरीता शासकीय भुखंड उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला विभागीय आयुक्तांनी गती देण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना सावे यांनी दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घरे उपलब्ध करुन देत त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी म्हाडाच्यावतीने सुमारे 9 लाख परवाडणाऱ्या घरांची निर्मिती केली आहे. पुणे म्हाडाच्यावतीने विविध उत्पन्न गटातील सुमारे 35 हजार सदनिका, 7 हजार 800 भुखंड आणि 755 गाळे वितरीत करण्यात आले आहे. सद्यस्थितीत विविध योजनेअंतर्गत 3 हजार 740 सदनिकांची निर्मिती प्रगतीपथावर आहे. म्हाडातर्फे 592 भूखंड वितरीत करण्यात आले आहे. जुन्या इमारतींचे पुर्नविकास करण्याची कार्यवाही करण्याच्यादृष्टीने गती देण्याचे प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

पुणे म्हाडाच्या 5 हजार 863 घरांसाठी 59 हजार 350 ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये म्हाडा गृहनिर्माण योजनेच्या 403घरांसाठी 1 हजार 724, प्रधानमंत्री आवास योजना 431घरांसाठी 270 , 20टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना 2 हजार 584 घरांसाठी 56 हजार 941 आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (म्हाडा गृहनिर्माण योजना) साठी 2 हजार 445 घरांसाठी 415 अर्ज प्राप्त झाले. सोडतीचा निकाल म्हाडाच्या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाच्या सूचना फलकावरही उपलब्ध आहे.

### कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी

15 हजार गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत विविध प्रकल्प उभारण्यात येत आहे. आगामी काळातही विविध उत्पन्न गटातील नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. यापुढे घरांची सोडत वर्षातून दोन वेळेस घेण्यासाठी म्हाडानी प्रयत्न करावेत. 20टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत अधिकाधिक नागरिकांना परवडणारी घरे देण्यासाठी प्रयत्न करावेत. पुणे विभागात विविध गृहनिर्माण योजनेकरीता शासकीय भुखंड उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाला विभागीय आयुक्तांनी गती देण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना सावे यांनी दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घरे उपलब्ध करुन देत त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी म्हाडाच्यावतीने सुमारे 9 लाख परवाडणाऱ्या घरांची निर्मिती केली आहे.

# आळंदी बंदचा निर्णय मागे!

## विठुरायाच्या पालखीचं स्वागत करणार

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यावर आळंदी (ALANDI) बंदचे सावट हटले आहे .गावकऱ्यांनी आळंदी बंदचा निर्णय घेतल्यानंतर बाजारपेठ पुन्हा गजबजली आहे. वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी गावकऱ्यांनी बंदचा निर्णय मागे घेतला. संध्याकाळी अलंकापुरीत दाखल होणाऱ्या संतांच्या पालख्यांचेही ग्रामस्थ स्वागत करणार आहेत. विश्वस्त पदासाठी वारकऱ्यांना वेठीस धरणं योग्य नाही, हे माऊलींनांही पटलं नसतं. असा सूर वारकऱ्यांमधून उमटला होता.**




संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळ्याची आजपासून झाली. पण पहिल्याच दिवसावर आळंदी बंदचे सावट होते. आळंदी सकाळपासून ठप्प होतीच पण मंदिर परिसरातील हार-फुलांची दुकानं वारकऱ्यांच्या सोयीसाठी खुली होती.

मात्र हैबतबाबांच्या पायरीचं पूजन होताच ही दुकानं ही बंद करण्यात आली. वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सदैव तत्पर असणारे आळंदीकर इतके आक्रमक का झाले असावेत? असा प्रश्न पडला असेल. तर त्याला कारण ठरलं स्थानिकांना विश्वस्त पदी डावलण्यात आल्याचं. त्यामुळं ही निवडप्रक्रिया कशी होते, हे पाहणं ही महत्वाचं आहे.

आळंदीकरांनी ऐन संजीवन समाधी सोहळ्यातच बंदचे हत्यार उपसले. आळंदी बंदच्याच पार्श्वभूमीवर सकाळी दहा वाजता निषेध मोर्चा काढण्यात आला. पण तोवर लाखो वारकरी अलंकापुरीत दाखल झाले होते. या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून देवस्थानच्या विश्वस्तांनी ग्रामस्थांना चर्चेसाठी बोलावलं. चर्चेसाठी बोलवणारे विश्वस्त हे वशिला लावून आलेत, त्यामुळं आम्ही त्यांच्याशी चर्चा करणार नसल्याचं स्थानिकांनी स्पष्ट केलं. स्थानिक ग्रामस्थांशी समेट घालून तोडगा काढण्याचे विश्वस्तांचे प्रयत्न निष्फळ ठरले. दुसरीकडे मोठी गैरसोय होत वारकऱ्यांमधून नाराजीचा सूर उमटू लागला. ज्या वारकऱ्यांमुळं आळंदीला महत्व प्राप्त झालंय. आता त्यांना फार काळ वेठीस धरणं, सोयीचं नसेल.

# चाकणकर यांच्याविरोधात सोशल मीडियावर मजकूर

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याविषयी समाजमाध्यमात अश्लील मजकूर प्रसारित केल्या प्रकरणी पुणे सायबर पोलिसांनी (Pune Cyber Police) गुन्हा दाखल करून चौघांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणावरून पुन्हा एकदा सोशल मीडियावर होत असलेल्या टीका-टिप्पणीवर प्रश्न निर्माण झाले आहेत. सोशल मीडियावर राजकीय नेत्यांवर टीका करताना खासगी, वैयक्तिक, चारित्र्यावर शंका उपस्थित करणारे मजकूर प्रसारीत केले जातात. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर (Rupali Chakankar) यांच्या बाबतीत एक अश्लील पोस्ट विकास सावंत, जयंत पाटील, रणजीतराजे हात्तींबरे, अमोल के. पाटील यांनी फेसबुकवर शेअर केली होती. या चौघांवर पुणे सायबर पोलीस ठाण्यात आयपीसी 354 (अ) आणि 509 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रुपाली चाकणकर यांचे भाऊ संतोष बबन बोराटे यांनी पुणे सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. यातील संशयित असलेल्या जयंत पाटील, रणजीतराजे हात्तींबरे आणि अमोल पाटील यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून त्यांचे मोबाईल क्रमांक सायबर पोलिसांनी मिळवले. त्याआधारे पोलीस पोलिसांनी जयंत रामचंद्र पाटील या सांगली जिल्ह्यातील धनगरवाडीत राहणाऱ्या आरोपीपर्यंत पोहचले . त्याला ताब्यात घेतले असता तपासादरम्यान तो मानसिक रुग्ण असल्याचे निष्पन्न झाले. त्याला सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस देऊन त्याचा जबाब नोंदवून मोबाईल जप्त केला.

# पक्षाची ध्येयधोरणे घरोघरी पोहोचिवणार!

## सुलभा उबाळे: शिवसेनेची ध्येयधोरणे घरोघरी पोचविण्यासाठी महिला सज्ज

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोरोना काळामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जबाबदार कुटुंब प्रमुख या नात्याने जनतेची सेवा केली. हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वसामान्य नागरिकांना शिवसेनेत बरोबर घेऊन मोठी पदे दिली. परंतु काहींनी शिवसेनेला अडचणीत आणून स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षात फूट पाडली. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष वाढविणे आणि पक्षाची ध्येयधोरणे घरोघरी पोचविण्यासाठी जबाबदारी महिला सक्षमपणे पार पाडण्यासाठी महिला सज्ज झाल्या आहेत असे प्रतिपादन जिल्हा संघटीका सुलभा उबाळे यांनी केले.**



शिवसेनेच्या पिंपरी चिंचवड शहर महिला आघाडी पदाधिकारी यांचा नियुक्ती पत्र वाटप समारंभ सेना भवन आकुर्डी येथे आयोजित करण्यात आला होता. शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार, पुणे शहर संपर्क प्रमुख सचिन अहिर तसेच महिला आघाडी मावळ पिंपरी चिंचवड संपर्कप्रमुख लतिका पाष्टे यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या. यावेळी सुलभा उबाळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा प्रमुख शैला खंडागळे, शहर संघटीका अनिता तुतारे, शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले आणि चेतन पवार युवा अधिकारी पिंपरी चिंचवड, युवराज कोकाटे शहर संघटक, रेखा दर्शले माजी नगरसेविका, नितीन बोंडे आदी उपस्थित होते. यावेळी पिंपरी, चिंचवड, भोसरी मधील अनेक महिलांनी पक्ष प्रवेश केला.

भोसरी विधानसभा संघटिका कल्पना शेटे, समन्वयक पिंपरी सुजाता काटे, गौरी घंटे, विभाग संघटिका सुजाता गायकवाड (अंजठा नगर), उपविभाग संघटिका साधना वाघमारे (भोसरी), शाखा संघटिका वंदना बनसोडे (अंजठा नगर), पिंपरी विधानसभा संघटिका डॉ. वैशाली अभय कुलते, समन्वयक पिंपरी चिंचवड वैभवी घोडके, उपशहर संघटिका कामिनी मिश्रा, सुषमा शेलार, विभाग संघटिका संगीता भारती (संत तुकाराम नगर), पुनम रिठे (पिंपरी) चिंचवड विधानसभा संघटिका मंगल भोकरे, समन्वयक चिंचवड विधानसभा उषा आल्हाट, उपशहर संघटिका रजनी वाघ, योगिनी मोहन, ज्योती भालके, विभाग संघटिका कमळ गोडांबे (पिंपळे सौदागर), वंदना वाल्हेकर (वाल्हेकर वाडी), वैशाली काटकर (चिंचवड), अमृता सुपेकर (रहाटणी), गीता कुसाळकर (वाकड), उपविभाग प्रमुख सुनिता सोनवणे (रहाटणी), श्रद्धा शिंदे (काळेवाडी), कलावती नाटेकर (चिंचवड), वंदना खंडागळे (पिंपळे सौदागर) हर्षाली घरटे(वाल्हेकरवाडी) तस्लीम शेख (काळेवाडी) या महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

### यांनी केला पक्ष प्रवेश...

» संगिता परेश शाह, पुष्पा पाटील, राणी देवकर, रेहाना शेख, बालिका गुरव, प्रतीक्षा जाधव, खरात पाटील, आलिया शहा, वाल्या शहा, कविता जाधव, रोहिणी पाटील, लतिका कुंभार, किरण संहिता, सोनी वाघमारे, बालिका वाघमारे, समरिन भालेराव, मनीषा गडावर, अरूणा सुर्यवंशी, नविता शिंदे, राणी सुवासे, सुरेखा भवारे, मनीषा जाधव, श्रद्धा माडे, बेबी जगताप, सुजाता गायकवाड, वंदना बनसोडे, साधना वाघमारे आदींनी पक्ष प्रवेश केला त्यांचे स्वागत शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांनी केली.

# शेतजमिनीच्या वादातून मध्यप्रदेशातून आणली ४ पिस्तुले

## चौघांना अटक, पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट दोनची कारवाई

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शेतजमिनीच्या वादातून एकाने मध्य प्रदेश येथून चार पिस्तुले आणि दहा काडतुसे आणली. यातील दोन पिस्तूल त्याने मित्र आणि नातेवाइकाला दिले. दरम्यान, याप्रकरणी पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने चौघांना अटक केली आहे.**




हरीश काका भिंगारे (३४, रा. औंध रोड आंबेडकरनगर चंद्रमणी संघ पुणे), गणेश बाळासाहेब कोतवाल (३०, रा. समर्थनगर, नवी सांगवी), शुभम जगन्नाथ पोखरकर (३०, रा. पाषाण पुणे), अरविंद अशोक कांबळे (४२, रा. पौड, ता. मुळशी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, एकजण पीडब्ल्यूडी मैदानाजवळ आला असून त्याच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी आरोपी हरिष भिंगारे, आरोपी गणेश कोतवाल यांना ताब्यात घेतले. दोघांच्या अंगझडतीमध्ये कंबरेला दोन पिस्तुले आणि पाच जिवंत काडतुसे मिळून आली.

अधिक चौकशीत आरोपींनी मागील सहा-सात महिन्यांपूर्वी मध्य प्रदेश येथे जाऊन एकूण चार पिस्तुले खरेदी करून आणल्याचे समोर आले. आरोपींनी दोन पिस्तूल पाषाण पुणे येथील त्यांचा मित्र आणि एक पिस्तूल येथील नातेवाइकाला दिल्याचे सांगितले. त्यानुसार, पोलिसांनी पाषाण येथून आरोपी शुभम पोखरकर यास तर पौड येथून आरोपी अरविंद कांबळे यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन पिस्तुल, पाच जिवंत काडतुसे जप्त केली. पोलिसांनी चार जणांकडून चार पिस्तूल जप्त केले आहेत.

ही कामगिरी पोलिस उपआयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे) सतीश माने, सहाय्यक पोलिस आयुक्त बाळासाहेब कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट दोनचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक जितेंद्र कदम, पोलिस उपनिरीक्षक गणेश माने, पोलिस अंमलदार शिवानंद स्वामी, केराप्पा माने, दिलीप चौधरी, उषा दळे, नामदेव कापसे, आतिष कुडके, अजित सानप, शिवाजी मुंढे, उध्दव खेडकर यांनी ही कारवाई केली.




# हा तर अमृतकाळातील पूर्वरंगाचा प्रसाद!

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जागतिक मान्यता असलेले कुशल नेतृत्व, केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा यांची नेमकी निवडणूक नीती आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डाजी यांची संघटना बांधणी या त्रिसूत्रीचे हे यश आहेच, पण देशभरातील मतदारांनी मोदीजींच्या नेतृत्वावर उमटविलेली पसंतीची मोहोरही या विजयातून ठळक झाली आहे.**

भाजपने गेल्या नऊ वर्षांतील केंद्रातील सत्तेद्वारे देशभरातील तळागाळातील जनतेपर्यंत विकासाची फळे पोहोचविण्याचा ध्यास घेतला, आणि आता जनतेने त्याची पोचपावती दिली आहे. जी-२० परिषदेपासून दुबईतील कॉप-२८ परिषदेपर्यंतच्या प्रत्येक जागतिक मंचावर मोदीजींनी भारताची प्रतिष्ठा उंचावली, भारताच्या संस्कृती आणि परंपरेची नवतेशी घातलेली अनोखी सांगड आणि जगाला त्याची ओळख करून देत संस्कृतीची शान उंचावण्याचा निरपेक्ष प्रयत्न यांमुळे भारताच्या जनतेस गेल्या पंचाहत्तर वर्षांत प्रथमच भाजपच्या सत्ताकाळातील अमृतकाळाची अनुभूती येत आहे. एका बाजूला स्पष्ट धोरण, नेमकी विकास नीती आणि सामान्य जनतेच्या उत्कर्षांचा ध्यास घेऊन निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या भाजपसमोर शड्डू ठोकण्याच्या आवेशात काँग्रेसने मात्र, राहुल गांधी यांच्या अपरिपक्व आणि जनमानसाची किंचितही




जाण किंवा ओळख नसलेल्या नेतृत्वाच्या पगडय़ाखालील आपली पराभवाची परंपरा कायम राखली. निवडणुकीच्या राजकारणात केवळ चिखलफेक करून लोकांची मते मिळविता येत नाहीत. लोकभावना जिंकण्याकरिता जनतेच्या समस्या जाणून घ्याव्या लागतात, जनतेच्या जगण्याशी एकरूप व्हावे लागते आणि समस्यामुक्तीचे शर्थीचे प्रयत्न करून जनतेच्या मनात विश्वासाची भावना रुजवावी लागते, हे काँग्रेसने ओळखले नाही. भाजपची स्पष्ट विकास नीती, प्रखर राष्ट्रभावना आणि देशहिताशी कोणतीही तडजोड न करता स्वच्छ कारभाराची हमी या तीन बाबी या निवडणुकीत जनतेचा स्पष्ट कौल संपादन करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. मध्य प्रदेशातील विजयाचे स्पष्ट चित्र भाजपला अगोदरच उमगले होते. राज्यातील शिवराजसिंह चौहान सरकारने अमलात आणलेल्या जनहिताच्या अनेक योजनांवर पसंतीची स्पष्ट मोहोर उमटविली आहे. राज्यातील साडेसात कोटी लोकसंख्येपैकी १.३२ कोटी महिलांच्या खात्यामध्ये थेट जमा होणारे साडेबाराशे रुपये ही केवळ निवडणुकीच्या निमित्ताने उधळलेली रेवडी नव्हती. या अर्थसाह्यामुळे कुटुंबात होणारी आर्थिक बचत त्यांच्या मुलाबाळांचे व्यक्तिमत्त्व विकसित करणाऱ्या शैक्षणिक सुविधांवर वापरता यावी आणि भविष्यातील पिढी सक्षम व्हावी हा पंतप्रधान मोदीजींचा स्पष्ट उद्देश या मदतीमुळे सफल होताना दिसत आहे. विकासाचा कोणताही ठोस कार्यक्रम नाही, जनहिताचे कोणतेही स्पष्ट धोरण नाही आणि केवळ मोदीविरोध हा एकच प्रचाराचा मुद्दा घेऊन जनतेसमोर जाणारे काँग्रेसी नेतृत्व आणि विकासाच्या ध्यासातून अंमलबजावणीवर भर देत जनहितासाठी काम करणारे भाजपचे नेतृत्व यांतील फरम्क मतदारांनी नेमका जाणला, हे मध्य प्रदेशासह राजस्थान आणि छत्तीसगडमधील यशाचे गमक आहे. छत्तीसगडमधील सत्ता काँग्रेसने गमावली, हा या पक्षाच्या भ्रष्ट कारभाराच्या अपयशाचा ढळढळीत पुरावा आहे. महादेव ऑनलाइन जुगार घोटाळय़ात खुद्द मुख्यमंत्र्यांवरच संशयाची सुई रोखली गेली होती. आदिवासी जनतेच्या भावना भडकावून भाजपविरोधी वातावरण तापविण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला, पण आदिवासी कल्याण हा भाजपसाठी राजकारणाचा मुद्दा नाही. आदिवासींच्या प्रगतीसाठी आणि या जनतेस समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारची प्रत्येक योजना सक्षमपणे राबविली जात आहे. शेतकरी, महिला, आदिवासींकरिता मोदी सरकारने आखलेल्या योजना यांना मिळणाऱ्या सकारात्मक प्रतिसादाचा एकत्रित परिणाम छत्तीगडमध्ये दिसून येत आहे. राजस्थानमध्ये गेहलोत सरकारच्या कारकिर्दीतील अत्याचार, लाल डायरीत दडलेली भ्रष्टाचाराची पाने, महिलांची असुरक्षितता, युवकांच्या भविष्याची कुचेष्टा आणि अंतर्गत सत्तासंघर्षांतून राज्याच्या हिताकडे झालेले दुर्लक्ष जनतेस मानवलेले नाही. कन्हैयालालच्या क्रूर हत्येनंतरही काँग्रेसने त्यातदेखील तुष्टीकरणाच्या राजकारणातून बोटचेपी भूमिका घेतली.

## संपादकीय »

### स्वान्तसुखाय सांख्यिकी!

***"स्वत:ला सोयीच्या, समाधान देणाऱ्या निष्कर्षांकडे दुर्लक्ष करा" असा सल्ला व्यवस्थापनशास्त्र देते. काँग्रेससाठी सध्या त्याचे स्मरण करून देण्याची गरज आहे.***

पराभवाच्या कठोर विश्लेषणाची अपेक्षा असताना पक्षाच्या धुरीणांनी "बघा.. आपली मते होती तितकीच आहेत" अशा प्रकारचा युक्तिवाद करणे हे तर सीतारामन-छापाचे तर्कट! पाच राज्यांतील निवडणुकांच्या निकालाचे कवित्व आणखी काही दिवस तरी सुरू राहील. या निकालाचा सांख्यिकी तपशील जसजसा समोर येईल तसतसे नवीन मुद्दे समजून घेता येतील. निकालाच्या दुसऱ्या दिवशी दोन ठसठशीत बाबी समोर येतात. एक म्हणजे मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या तीनही राज्यांत 'आम आदमी पक्षा'चा पार धुव्वा उडाला. दुसरी बाब लक्षात घेण्यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या युक्तिवादाचा आधार घ्यावा लागेल. गतवर्षी भारतीय रुपया जेव्हा नीचांक गाठत होता त्या वेळी आपल्या अर्थमंत्रीबाईंनी रुपया अशक्त होत असल्याचे नाकारले.

**मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपचा मोठा विजय होऊन विद्यमान मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांची सद्दी कायम राहील, याची खात्री प्रत्यक्ष निकाल लागेपर्यंत कुणीही देत नव्हते. पण शिवराजसिंह चौहान यांची गेल्या सुमारे १८ वर्षांतील कारकीर्द आणि कृषी क्षेत्रातील मध्य प्रदेशाची प्रगती यांचा संबंध या विजयाशीही आहे, हे वास्तव कदाचित राजकीय विश्लेषणांतून नजरेआड होऊ शकते.**

# शिवराजसिंह यांचा विजय कृषी-प्रगतीमुळे!

मध्य प्रदेशातील कृषी क्षेत्राने २०१३- १४ ते २०२२-२३ या आर्थिक वर्षांच्या दशकभरात सरासरी ६.१ टक्क्यांचा वाढदर नोंदवला आहे. याच दशकात कृषी क्षेत्राचा देशभरातील सरासरी वाढदर ३.९ टक्के होता. चौहान यांना २९ नोव्हेंबर २००५ रोजी पहिल्यांदा मुख्यमंत्रीपद मिळाले, त्यानंतर १३ वर्षे सलग ते या पदावर होते. त्यानंतर गेली पावणेचार वर्षे ते पुन्हा मुख्यमंत्रीपदी आहेत. शिवराजसिंह यांची कारकीर्द दीर्घ असल्यामुळे, नेहरूकाळात पंजाबचे मुख्यमंत्री असलेले प्रतापसिंग कैरों यांच्या कारकीर्दीशी त्यांची तुलना केल्यास दोघांचेही विजय प्रामुख्याने कृषी क्षेत्राच्या भरभराटीमुळे घडून आले, हेही आकडेवारीने दाखवून देता येऊ शकते. कमी क्षेत्र, कमी पाण्यात अधिक पीक हा शेती विकासाचा महत्त्वाचा निर्देशक. मध्य प्रदेशात २००४-०५ ते २०२१-२२ या कालावधील लागवडीखालील क्षेत्र अवघ्या ५.७ टक्क्यांनी वाढले. म्हणजे २००४- ०५



मध्ये एकंदर १४९.७५ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते, ते १७ वर्षांनंतर एकंदर १५८.२३ लाख हेक्टर इतके झाले, पण पिकांचे प्रमाण (ग्रॉस क्रॉप्ड एरिया किंवा जीसीए) मात्र तब्बल ४८.७ टक्क्यांनी वाढले. हे प्रमाण आज देशात सर्वाधिक आहे. उत्तर प्रदेश हा २००४ -०५ मध्ये लागवड आणि पीक यांच्या या प्रमाणात पहिल्या क्रमांकावर होता, त्यानंतर महाराष्ट्र व राजस्थान यांचा क्रमांक त्या वेळी लागत असे.. पण आता मध्य प्रदेश पहिल्या क्रमांकावर आला आहे. जीसीए' वाढल्याचा दुसरा अर्थ असा की, जमीन तेवढीच राहूनही '१.९ पट पीक' मिळू लागले आहे- हेही प्रमाण साधारण पंजाबएवढे आहे आणि देशाचे सरासरी प्रमाण '१.५५ पिके' एवढे आहे- पण इथे लक्षात घेतले पाहिजे की, पंजाब किंवा देशातील अन्य राज्ये ओलिताखाली आल्यानंतरच पिकांचे प्रमाण वाढल्याचे दिसले. मध्य प्रदेशात अवघ्या १७ वर्षांमध्ये ओलिताखालील क्षेत्र किती वाढावे? २००४- ०५ मधील अवघ्या ६०.४२ लाख हेक्टरवरून २०२१-२२ मध्ये १२९.०३ लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले- म्हणजे दुपटीहून जास्तच! राज्यात ओलिताखाली असलेले क्षेत्र ४० टक्क्यांवरून ८१.५ टक्क्यांपर्यंत वाढवणे, ही शिवराजसिंह चौहान यांच्या सरकारने कृषी क्षेत्रात साधलेली महत्त्वाची प्रगती ठरते. हे साध्य होण्यात अर्थात बराच वाटा भूजलाचा आहे. भूजल वापरासाठी खोदलेल्या कूपनलिकांतून पाणीपुरवठा होत राहण्यासाठी कृषीपंपांना वीजजोडण्या देण्यात येतात, अशा जोडण्यांची संख्या २०१० – ११ मधील १३.२ लाखांवरून २०२०-२१ या आर्थिक वर्षांत ३२.५ लाखांवर गेली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदे समितीचा आज हैदराबाद दौरा!

## » मराठा आरक्षणसंदर्भात सरकारच्या हालचाली

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी अशा नोंदी असलेल्यांना कुणबी प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात आणखी पुरावे मिळविण्यासाठी न्या. संदीप शिंदे समिती बुधवारी हैदराबादला जाणार आहे. तेलंगणा सरकारकडून निजामकालीन कागदपत्रांमध्ये उर्दू किंवा अन्य भाषांमध्ये असलेल्या नोंदी मिळविण्यासाठी ही समिती जाणार आहे.**



तेलंगणा सरकारच्या जुन्या कागदपत्रांमधून किती कुणबी नोंदी मिळतात, हे मराठवाड्यातील मराठा समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी आरक्षणासाठी सरकारला दिलेली २४ डिसेंबरची मुदत लक्षात घेऊन सरकारकडून वेगाने हालचाली सुरू असून राज्य मागासवर्ग आयोगाचीही लवकरच पुनर्रचना केली जाणार आहे. मराठा समाजातील नागरिकांच्या शासनदरबारी असलेल्या विविध प्रकारच्या कागदपत्रांमधून कुणबी नोंदी तपासण्यासाठी राज्य सरकारने उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. मराठवाड्यातील मराठा समाजाच्या नागरिकांकडे पुरावे उपलब्ध नव्हते. त्यामुळे गेल्या दीड महिन्यामध्ये मराठवाड्यात व्यापक सर्वेक्षण हाती घेण्यात आले आणि राज्यातही पुरावे तपासले गेले. त्यानंतर समितीकडे आतापर्यंत सुमारे २७-२८ हजार कुणबी नोंदी सापडल्या असल्याचे उच्चपदस्थांनी 'लोकसत्ता' ला सांगितले. त्याचा लाभ मराठा समाजातील चार-पाच लाख नागरिकांना होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात निजामकालीन राजवटीतील कागदपत्रे तेलंगणा सरकारच्या महसूल विभागाकडे आहेत. समितीला कोणती कागदपत्रे हवी आहेत, याबाबत तेलंगणा सरकारच्या महसूल विभागास प्रधान सचिव विकास खारगे यांनी काही दिवसांपूर्वीच कळविले होते. त्यानुसार ही कागदपत्रे समितीस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ही मूळ कागदपत्रे किंवा त्याच्या प्रती ताब्यात घेऊन तातडीने भाषांतर केले जाईल व नोंदी तपासल्या जातील, असे सूत्रांनी नमूद केले. मनोज जरांगे यांनी आरक्षणासाठी सरकारला दिलेली २४ डिसेंबरची मुदत लक्षात घेऊन सरकारकडून वेगाने हालचाली सुरू असून राज्य मागासवर्ग आयोगाचीही लवकरच पुनर्रचना केली जाणार आहे. मराठा समाजातील नागरिकांच्या शासनदरबारी असलेल्या विविध प्रकारच्या कागदपत्रांमधून कुणबी नोंदी तपासण्यासाठी राज्य सरकारने उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे.

### सरकारकडून वेगाने हालचाली

» मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी आरक्षणासाठी सरकारला दिलेली २४ डिसेंबरची मुदत लक्षात घेऊन सरकारकडून वेगाने हालचाली सुरू असून राज्य मागासवर्ग आयोगाचीही लवकरच पुनर्रचना केली जाणार आहे. मराठा समाजातील नागरिकांच्या शासनदरबारी असलेल्या विविध प्रकारच्या कागदपत्रांमधून कुणबी नोंदी तपासण्यासाठी राज्य सरकारने उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. मराठवाड्यातील मराठा समाजाच्या नागरिकांकडे पुरावे उपलब्ध नव्हते.

# शाळांच्या वेळा बदलण्याबाबत विचार!

## » शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गृहपाठ कमी द्यावा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अलीकडच्या काळात सर्वांच्याच झोपेच्या वेळा बदलल्या आहेत. मध्यरात्रीनंतरही मुले जागी राहतात. परंतु, शाळांसाठी त्यांना लवकर उठावे लागते व त्यामुळे त्यांची झोप पूर्ण होत नाही. मुलांची झोप चांगली व्हावी या दृष्टीने शाळांच्या वेळा बदलण्याबाबत विचार व्हावा, अशी सूचना राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केली. "मुलांच्या दप्तराचा भार हलका करण्यासाठी 'पुस्तक – विहीन' शाळा, ई – वर्ग यांना चालना द्यावी. तसेच शाळांचे गुणवत्तेनुसार श्रेणीकरण करावे," अशाही सूचना राज्यपालांनी केल्या.**



### केवळ सुरक्षित सामग्री पोहोचावी

» इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या हाती केवळ सुरक्षित सामग्री पोहोचावी या दृष्टीने पालक व शिक्षकांनी जागरूक राहिले पाहिजे. सायबर गुन्ह्यांपासून मुलांचे रक्षण व्हावे यासाठी शाळांमध्ये व्याख्याने व सत्रांचे आयोजन केले जावे," अशीही सूचना राज्यपालांनी केली. "गावांमध्ये एकवेळ मंदिर, मस्जिद अथवा चर्च नसले तरीही चालेल, परंतु आदर्श शाळा असावी," असे सांगून राज्य शासन शिक्षण व आरोग्याला प्राधान्य देत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले. शिक्षण विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व्हावे या दृष्टीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गृहपाठ कमी द्यावा, तसेच खेळ व इतर कृतिशील उपक्रमांवर भर द्यावा," असे राज्यपालांनी म्हटलं.

राज्यपाल बैस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ५) शालेय शिक्षण विभागाच्या सहा प्रोत्साहनात्मक योजनांचा राजभवन येथे शुभारंभ करण्यात आला, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा', 'गोष्टींचा शनिवार', 'आनंददायी वाचन', 'दत्तक शाळा उपक्रम', 'माझी शाळा माझी परसबाग', 'स्वच्छता मॉनिटर – २' व मुंबई महानगर पालिकेच्या नवीन शालेय इमारतींचे लोकार्पण आदी योजनांचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, आयुक्त सुरज मांढरे आदी उपस्थित होते. "राज्यात शेकडो सार्वजनिक ग्रंथालये आहेत. मात्र, आज ग्रंथालये ओस पडली आहेत.

अधिकतर पुस्तके जुनी किंवा कालबाह्य झाली आहेत. सर्व वाचनालयांना इंटरनेट, कॉम्पुटर सुविधा देऊन नवसंजीवनी देणे आवश्यक आहे. यासाठी ग्रंथालय दत्तक योजना देखील चालू केली पाहिजे व ग्रंथालयांचा कायापालट केला पाहिजे," असे राज्यपालांनी सांगितले. "आजकाल विद्यार्थी केवळ पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञान ग्रहण करीत नसून ते इंटरनेट, समाजमाध्यमे यांसह विभिन्न स्रोतांमधून ज्ञान मिळवत आहेत. मुलांचा बुद्ध्यांक वाढत असून शिक्षकांनी अध्ययनाच्या बाबतीत अद्ययावत राहिले पाहिजे.

# घोषणा करून भुलभुलैया करू नका

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सरकारच्या 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमाला 'बोगस' म्हणत टीका केली होती. याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. अडीच वर्षे घरात बसून बोगसगिरी करणाऱ्यांनी 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमाला 'बोगस' म्हणणं हा जनतेचा अपमान आहे, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. शेतकऱ्यांची अवस्था फार वाईट आहे.

'शासन आपल्या दारी' म्हणून चालू असलेला बोगसपणा बंद पडला आहे. कारण, कुणी दारातही उभे करण्यास तयार नाही. फार भयानक परिस्थिती आहे. कुणी त्यांना विचारत नाही. पिकविम्याचे पैसे मिळत नाही," असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं. "सरकारचा उल्लेख दुष्काळात तेरावा महिना असा याआधीही केला आहे.

शेतकऱ्यांचं कर्ज वाढत आहे. बँकांचे तगादे शेतकऱ्यांमागे लागले आहेत. विमा कंपन्यांची दारे ठोठावली तरी उघडत नाहीत. ही थोतांड नाटके बंद करून शेतकरी कर्जमाफी करावी. निवडणुका तोंडावर आहेत घोषणा करून भुलभुलैया करू नका," असंही ठाकरेंनी सरकारला ठणकावलं होतं.

याला प्रत्युत्तर देताना एकनाथ शिंदेंनी म्हटलं, "काहीजण म्हणतात, 'शासन आपल्या दारी' बोगस कार्यक्रम आहे. अडीच वर्षे घरी बसणाऱ्यांना 'शासन आपल्या दारी'चं महत्वं काय कळणार? शेतकरी, कष्टकरी आणि माता-भगिनींच्या वेदना काय कळणार? ज्यांनी अडीच वर्षे घरात बसून बोगसगिरी केली, त्यांनी 'शासन आपल्या दारी'ला बोगस म्हणणं म्हणजे कार्यक्रमाला आलेल्या जनतेचा अपमान आहे. आपली टिंगलटवळी करणाऱ्यांना योग्यवेळी उत्तर गेल्याशिवाय राहणार नाही."

# लोकसभा निवडणुका मार्चमध्ये होणार?

## ‘विधानसभां’मधील यशाच्या आधारे निवडणुकांची रणनिती

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीत तीन राज्ये सहजगत्या जिंकल्यानतर आता भाजपने केंद्रातील सत्तेची हॅट्रिक साध्यासाठी लोकसभा निवडणुका मार्चमध्ये घेण्याची तयारी चालविल्याचे उच्चपदस्थ सुत्रांकडून समजते. अयोध्येतील राममंदिरात मूर्ती प्रतिष्ठापनेनंतर होणाऱ्या छोटेखानी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लेखानुदान मंजूर केले जाईल. त्यानंतर लगेच फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकांचे रणशिंग फुंकले जाऊ होऊ शकते.**



लवकर होणाऱ्या निवडणुकांसाठी खासदारांकडे केवळ ६० दिवसांचा कालावधी राहू शकतो. त्यामुळे त्यांनी आपापल्या मतदार संघांवर लक्ष केंद्रीत करावे, अशा सूचना भाजपने दिल्या आहेत. सोबतच, एनडीएतील घटक पक्षांनाही सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे. तीन राज्यांमध्ये मिळालेल्या दणदणीत यशानंतर विजयाच्या लाटेत सातत्य राखण्याच्या रणनितीचा भाग म्हणून २०२४ च्या लोकसभा निवडणुका काही आठवडे अलिकडे घेण्याची आखणी सुरू असल्याचे कळते. विधानसभा निवडणुकांमधील दारुण पराभवानंतर कॉंग्रेसमधील नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा उत्साह मावळला आहे. तर विरोधकांच्या इंडिया आघाडीमध्येही गोंधळाचे वातावरण असून लोकसभेसाठी जागा वाटप, भाजपविरुद्ध एकास एक उमेदवार देण्याचा प्रस्ताव यासारख्या गोष्टी हवेतच आहे. याचा परिस्थितीत भाजपला जास्तीत जास्त यश मिळण्याची संधी असल्याचेही भाजप धुरीणांचे म्हणणे आहे. मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान विधानसभा निवडणुकांचे यश आणि राममंदिराचा मुद्दा मतदारांच्या विस्मृतीत जाण्याआधीच त्याचा लाभ घ्यावा, तसेच गोंधळलेल्या विरोधी पक्षांना सावरण्याची संधी देण्याआधीच लोकसभा निवडणुका घ्याव्यात या रणनितीवर गांभीर्याने विचार भाजपमध्ये सुरू आहे. त्यामुळे, कोणतीही अडचण न आल्यास फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात लोकसभा निवडणुकांची घोषणा होऊ शकते आणि त्यानंतर आचार संहिता लागू होऊ शकते, असे सुत्रांनी सांगितले. तत्पूर्वी, जानेवारीच्या अखेरीस सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मोदी सरकार निवडणूक वर्ष असल्याने लेखानुदान मांडेल. त्यात शेतकरी, महिलांशी संबंधित आकर्षक घोषणांचा देखील समावेश राहू शकतो. अर्थात, या या अधिवेशनाचा कालावधी अवघ्या आठवडाभराचा राहील असे संकेत मिळत आहेत. भाजपने निवडणूक प्रचारात मोदी है तो मुमकीन है, मोदींची गॅरंटी, सत्तेची हॅट्रिक यासारखे शब्दप्रयोग लोकांपर्यंत पोहोचविले होते. यानिमित्ताने कार्यकर्त्यांमध्ये वाढलेल्या उत्साह, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींची उंचावलेली प्रतिमा आणि राममंदिराच्या निमित्ताने मतदारांमध्ये वाढणारी धार्मिक भावना या त्रिसुत्रीच्या आधारे लोकसभेमध्ये ३५० जागा मिळविण्याचे उद्दीष्ट गाठता येईल, असा भाजपचा होरा आहे. त्यामुळेच, अयोध्येतील राम मंदिरामध्ये २२ जानेवारीला होणाऱ्या रामलल्ला मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानंतर निवडणुकांची घोषणा व्हावी, जेणे करून मार्चमध्ये होणाऱ्या निवडणुकीत राममंदिर मुद्द्याचे भांडवल करता येईल असा प्रयत्न आहे. त्यापार्श्वभूमीवर राममंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळा शहरी तसेच ग्रामीण भागांसह देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी मुद्रीत, दृकश्राव्य, डिजिटल सर्व प्रकारच्या माध्यमांतून पोहोचविण्याचीही आखणी झाल्याचे समजते. १५ डिसेंबरपासून या प्रचार मोहिमेला सुरवात होणार असल्याचीही माहिती समोर आली आहे. यात प्रामुख्याने तरुणाईवर लक्ष केंद्रीत केले जाणार असून ठिकठिकाणी मोदींच्या प्रतिमेसोबत सेल्फी काढण्यासाठीचे सेल्फी पॉईंट उभारण्याची आखणी करण्यात आली आहे. मागील लोकसभा निवडणुका २०१९ मध्ये ११ एप्रिल ते १९ मे अशा महिनाभराच्या कालावधीत सात टप्प्यांमध्ये झाल्या होत्या. मात्र, हा कालावधी देशाच्या बहुतांश भागात उन्हाचा तडाखा वाढण्याचा असल्याने त्याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होतो. त्यामुळे उन्हाचे प्रमाण कमी असलेल्या मार्चमध्ये लोकसभा निवडणुका घेणे सोईस्कर ठरेल, असाही युक्तिवाद सत्ताधारी वर्तुळातून पुढे करण्यात येत आहे. २००४ मध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीने इंडिया शायनिंगची घोषणा देऊन लवकर निवडणुका घेतल्या होत्या.

### तर धनुष्यबाण अयोध्येत जाणार

शिवसेनेच्या आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी विधानसभाध्यक्षांसमोर सुरू आहे. या प्रकरणाचा अनुकूल निकाल राममंदिराच्या उद्घाटनापूर्वी लागल्यास विजयोत्सव साजरा करण्यासाठी शिवसेनेचे धनुष्यबाण निवडणूक चिन्ह शिंदे गटातर्फे अयोध्येला नेण्यात येईल. तसेच या निमित्ताने महाराष्ट्रात हिंदुत्ववादाचा मुद्दा आक्रमकपणे मांडण्यात येईल, असेही नियोजन झाल्याचे सुत्रांकडून कळते.लवकर होणाऱ्या निवडणुकांसाठी खासदारांकडे केवळ ६० दिवसांचा कालावधी राहू शकतो. त्यामुळे त्यांनी आपापल्या मतदार संघांवर लक्ष केंद्रीत करावे, अशा सूचना भाजपने दिल्या आहेत. सोबतच, एनडीएतील घटक पक्षांनाही सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे. तीन राज्यांमध्ये मिळालेल्या दणदणीत यशानंतर विजयाच्या लाटेत सातत्य राखण्याच्या रणनितीचा भाग म्हणून २०२४ च्या लोकसभा निवडणुका काही आठवडे अलिकडे घेण्याची आखणी सुरू असल्याचे कळते.

# रेवंत रेड्डी तेलंगणाचे नवे मुख्यमंत्री; ७ डिसेंबरला शपथविधी

## रेवंत रेड्डी यांची दोन वर्षांपूर्वी त्यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली होती

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अभाविप, तेलुगू देशम, भारत राष्ट्र समिती आणि कॉंग्रेस, असा राजकीय प्रवास करणारे रेवंत रेड्डी यांची तेलंगणाच्या मुख्यंत्रीपदी निवड झाली आहे. पक्षांतर्गत विरोध असतानाही पक्षाने रेड्डी यांना संधी दिली आहे. यामुळेच पक्षात एकवाक्यता राखण्याचे मोठे आव्हान रेड्डी यांच्यासमोर असेल.**




रेवंत रेड्डी हे २०१७ मध्ये कॉंग्रेसमध्ये सहभागी झाले होते. दोन वर्षांपूर्वी त्यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली होती. तेव्हापासून रेड्डी आणि कॉंग्रेसमधील जुन्याजाणत्या नेत्यांचे सूर जुळले नव्हते. रेड्डी यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून काही नेत्यांनी कॉंग्रेसला रामराम ठोकला होता. ५४ वर्षीय अनुमुला रेवंत रेड्डी यांची आतापर्यंतची कारकिर्द वादग्रस्त ठरली आहे. विधान परिषद निवडणुकीत मतांसाठी पैसे वाटल्याच्या आरोपावरून रेड्डी हे तुरुंगातही जाऊन आले आहेत. तेलंगणातील वादग्रस्त 'व्होट फॉर नोट' घोटाळ्याशी रेवंत रेड्डी यांचे नाव जोडले गेले होते. विधान परिषद निवडणुकीत नामनियुक्त आमदाराला तेलुगू देशमला मत देण्यासाठी लाच दिल्याचा आरोप रेड्डी यांच्यावर होता. या प्रकरणात रेड्डी यांना अटकही झाली होती. विद्यार्थी दशेत अभाविपशी जोडले गेलेले रेवंत रेड्डी कोणत्याच राजकीय पक्षात स्थिरावले नाही. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचा पराभव करणे या एकमेव उद्देशाने निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या रेवंत रेड्डी यांचा राजकीय प्रवास चंद्रशेखर राव यांच्या तेलंगणा राष्ट्र समितीमधूनच झाला होता. जिल्हा परिषद निवडणुकीत पक्षाने उमेदवारी नाकारल्याने त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. तेव्हा कॉंग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला होता. पुढे त्यांनी चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील तेलुगू देशममध्ये प्रवेश केला होता. २०१७ मध्ये त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. २०१८च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. पण २०१९च्या लोकसभा निवडणुकीत मलकाजगिरी मतदारसंघातून निवडून आले होते. मावळते मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या सरकारच्या काळातील भ्रष्टाचार, घराणेशाहीवर रेवंत रेड्डी तुटून पडले होते. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचे तेलंगणात नियोजन करण्यात रेड्डी यांची भूमिका महत्त्वाची होती. राहुल गांधी यांच्या यात्रेला तेलंगणात चांगला प्रतिसाद मिळाला होता. निवडणुकीपूर्वी राज्य कॉंग्रेसमधील नेत्यांची तोंडे चोहोबाजूला होती. रेवंत रेड्डी यांचे अन्य नेत्यांशी अजिबात पटत नव्हते. पण निवडणूक जिंकण्यासाठी केलेले प्रयत्न, के. चंद्रशेखर राव यांना लक्ष्य केल्याने कॉंग्रेसला झालेला फायदा यातून पक्षाने रेवंत रेड्डी यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपविली आहे.

# नागराज मंजुळेंच्या 'खाशाबा!



दिग्दर्शक नागराज मंजुळे (NAGRAJ MANJULE) हे त्यांच्या चित्रपटांनी प्रेक्षकांची मनं जिंकत असतात. त्यांच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. सध्या त्यांच्या खाशाबा या आगामी चित्रपटाची चर्चा होत आहे. या चित्रपटाची कथा खाशाबा जाधव (KHASHABA JADHAV) यांच्या आयुष्यावर आधारित असणार आहे. आटपाट प्रोडक्शनच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरुन नुकताच एक खास व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये खाशाबा या चित्रपटाच्या शूटिंगच्या पहिल्या दिवसाची खास झलक दाखवण्यात आली आहे. आटपाट प्रोडक्शनच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरुन शेअर करण्यात आलेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे की, चित्रपटाच्या शूटिंग सेटवर लगबग सुरु आहे. नागराज मंजुळे हे सगळ्यांना इंस्ट्रक्शन्स देताना दिसत आहेत. व्हिडीओमध्ये काही पैलवान कुस्ती खेळताना देखील दिसत आहेत. खाशाबा या चित्रपटाच्या शूटिंगच्या पहिल्या दिवसाच्या व्हिडीओमध्ये नागराज मंजुळे म्हणतात, "खाशाबाच्या शूटिंगचा हा पहिला दिवस आहे. खाशाबा जाधव हे आपल्या मराठी मातीतले नायक आहेत.गेल्या तीन-चार वर्षांपासून आम्ही या चित्रपटाची तयारी करत आहोत. मी खूप उत्सुक आहे. दिग्दर्शन करायला मजा येत आहे. खूप चांगली टीम आहे.चांगभलं!" आटपाट प्रोडक्शनच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरुन शेअर करण्यात आलेल्या व्हिडीओला कॅप्शन देण्यात आलं, "खाशाबाच्या नावानं चांगभलं ! मराठी मातीत जन्म घेऊन जगाच्या नकाशावर भारताचे नाव कोरणाऱ्या, झुंजार नायकाची गोष्ट, 'खाशाबा!'

# औरों में कहां दम थाची रिलीज डेट जाहीर

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता अजय देवगण (AJAY DEVGN) आणि अभिनेत्री तब्बू (TABU) यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. प्रेक्षकांना अजय आणि तब्बूची जोडी खूप आवडते. तब्बू आणि अजय हे दोघे पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहेत. हे दोघे 'औरों में कहां दम था' (AURON MEIN KAHAN DUM THA) या चित्रपटामधून प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहे. नुकतीच या चित्रपटाची रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली आहे. नीरज पांडे यांच्या आगामी 'औरों में कहाँ दम था' या चित्रपटात अजय देवगण आणि तब्बू हे काम करणार आहेत. नीरज पांडे यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. अजय आणि तब्बूचा हा चित्रपट पुढील वर्षी 26 एप्रिल 2024 रोजी प्रदर्शित होणार आहे. अजयनं 5 डिसेंबर रोजी ट्विटरवर पोस्ट शेअर करुन 'औरों में कहाँ दम था' या चित्रपटाची घोषणा केली होती - "मी नीरज पांडे यांच्या 'औरों में कहाँ दम था' या चित्रपटाची घोषणा करत आहे." चित्रपटाच्या प्रदर्शनाची जरी तारीख जाहीर झाली असली तरी चित्रपट थिएटरमध्ये किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे याबद्दल अद्याप माहिती मिळू शकलेली नाही. अजय देवगण आणि तब्बू व्यतिरिक्त जिमी शेरगिल, सई मांजरेकर आणि शंतनू माहेश्वरी सारखे दिग्गज कलाकार और में कहा दम था या चित्रपटामध्ये काम करणार आहेत. बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता अजय देवगण (AJAY DEVGN) आणि अभिनेत्री तब्बू (TABU) यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. प्रेक्षकांना अजय आणि तब्बूची जोडी खूप आवडते. तब्बू आणि अजय हे दोघे पुन्हा एकदा एकत्र दिसणार आहेत. हे दोघे 'औरों में कहां दम था' (AURON MEIN KAHAN DUM THA) या चित्रपटामधून प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहे. नुकतीच या चित्रपटाची रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली आहे. नीरज पांडे यांच्या आगामी 'औरों में कहाँ दम था' या चित्रपटात अजय देवगण आणि तब्बू हे काम करणार आहेत.



# 'फायटर' मधील दीपिकाचा लूक

अभिनेत्री दीपिका पादुकोणसाठी 2023 हे वर्ष खास ठरले कारण तिचे पठाण (PATHAAN) आणि जवान (JAWAN) हे दोन्ही चित्रपट ब्लॉकबस्टर ठरले. आता दीपिकाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. दीपिका ही तिच्या चाहत्यांना नवीन वर्षाच्या सुरुवातीला खास गिफ्ट देणार आहे. तिचा फायटर (FIGHTER) हा चित्रपट जानेवारी महिन्यात रिलीज होत आहे. या चित्रपटामधील दीपिकाचा जबरदस्त लूक रिलीज करण्यात आला आहे. फायटर या चित्रपटात दीपिका कोणती भूमिका साकारणार आहे? याबाबत जाणून घेऊयात... दीपिकानं तिच्या फायटर या चित्रपटातील लूकचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. या फोटोला तिनं कॅप्शन दिलं, "स्क्वाड्रन लीडर मीनल राठोड,कॉल साइन: मिनी,डेजिग्नेशन: स्क्वाड्रन पायलट,युनिट: एअर ड्रॅगन" दीपिकाच्या या लूकला नेटकऱ्यांची पसंती मिळाली आहे. नेटकऱ्यांनी दीपिकानं शेअर केलेल्या फोटोवर लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. याआधी 'फायटर' या चित्रपटातील हृतिक रोशनचा लूक रिलीज करण्यात आला. त्याच्या या लूकनं देखील अनेकांचे लक्ष वेधले आहे. हृतिक रोशननं सोशल मीडियावर त्याच्या फायटर या चित्रपटामधील लूकचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला.



# तृप्ती डिमरी आहे तरी कोण?

ॲनिमल (ANIMAL) च्या रिलीज आधी तृप्ती डिमरीचे नाव प्रकाशझोतात आले नव्हते. (ANIMAL ACTRESS TRIPTI DIMRI ) परंतु, चित्रपट रिलीजनंतर ती चर्चेत आली आहे. तृप्तीने ॲनिमल चित्रपटात रणबीर कपूर (RANBIR KAPOOR) सोबत इंटीमेट सीन देऊन पडद्यावर धुमाकूळ घातला आहे. ॲनिमलमध्ये तृप्तीच्या न्यूड सीनचीदेखील खूप चर्चा होताना दिसतेय. संदीप रेड्डी वांगाचा चित्रपट ॲनिमल बॉक्स ऑफिसवर हिट ठरत आहे. चित्रपटगृहात या चित्रपटाचे शो हाऊसफुल्ल होत आहेत. ॲनिमलमध्ये रणबीर कपूर आणि रश्मिका मंदानासोबत तृप्ती डिमरीदेखील आहे. या चित्रपटामध्ये दोन्ही अभिनेत्रींनी रणबीरसोबत काम केले आहे. ॲनिमलमध्ये तृप्ती डिमरीने जोयाची भूमिका साकारली होती. चित्रपटामध्ये ती विलेन अबरार हक (बॉबी देओल) च्या साथीने रणविजय सिंह (रणबीर कपूर) ला मारण्यासाठी जाते.

# अजिंक्य ननावरे आणि शिवानीची लव्ह स्टोरी

अभिनेत्री शिवानी सुर्वे (SHIVANI SURVE) ही सध्या तिच्या झिम्मा-2 या चित्रपटामुळे चर्चेत आहे. झिम्मा-2 हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटात शिवानीनं मनाली ही भूमिका साकारली आहे. शिवानीनं अनेक मालिका आणि चित्रपटांमध्ये देखील काम केलं आहे. नुकतीच शिवानीनं सुलेखा तळवलकर यांच्या युट्यूब चॅनलला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीमध्ये शिवानीनं



अभिनेता अजिंक्य ननावरे(AJINKYA NANAWARE) आणि तिच्या लव्ह स्टोरीबद्दल सांगितलं. शिवानीनं मुलाखतीमध्ये सांगितलं, " 2015 मध्ये मी आणि अजिंक्य तू जीवाला गुंतवावे या मालिकेच्या सेटवर भेटलो. तेव्हा मैत्री झाली पण ती मालिका नंतर बंद झाली. मालिका बंद झाल्यानंतर आम्हाला वाटलं की, आमचं नातं थोडं वेगळं आहे. त्यानंतर आम्ही भेटायला लागलो."अजिंक्यबद्दल शिवानी म्हणाली, "तो खूप शांत आहे.

# कोण आहे मल्लिका सागर?

## » आयपीएल लिलावात साकारणार लिलावकर्त्याची भूमिका

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) मल्लिका सागरची इंडियन प्रीमियर लीग २०२४च्या खेळाडूंच्या लिलावासाठी लिलावकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे. आयपीएल २०२४चा लिलाव १९ डिसेंबर रोजी दुबईतील कोकाकोला एरिना येथे होणार आहे. यंदाच्या महिला प्रीमियर लीगच्या लिलावात मलिष्का सागरचाही मोठा वाटा होता. यापूर्वी बीसीसीआय आयपीएल लिलावासाठी चारू शर्मा, रिचर्ड मॅडले किंवा ह्यू ॲडम्स हे लिलावकर्त्यांची भूमिका बजावत होते.**

या वर्षाच्या सुरुवातीला महिला प्रीमियर लीग लिलावाच्या उद्घाटन सत्रादरम्यान मल्लिकाही आली होती. आयपीएल लिलावासाठी बीसीसीआय सहसा रिचर्ड मॅडली किंवा ह्यू ॲडम्स यांना सांगते. परंतु, २०२२ मध्ये मेगा-लिलावादरम्यान ॲडम्स "पोस्चरल हायपोटे-शन" मुळे बेशुद्ध झाल्यामुळे, बीसीसीआय कोणतीही जोखीम घेऊ इच्छित नाही. स्पोर्ट्स लीगमधील खेळाडूंच्या लिलावासाठी मल्लिका अनोळखी नाही, तिने २०२१ मध्ये प्रो कबड्डीचा लिलावा दरम्यान लिलावकर्त्याची भूमिका पार पाडली होती. मुंबईत राहून ती सल्लागार म्हणून काम करते. तिंच लिलावातील प्रवास २००१ मध्ये क्रिस्टीज या प्रसिद्ध ब्रिटिश लिलावामधून सुरू झाला होता. या वर्षाच्या सुरुवातीला डब्ल्यूपीएल लिलावापूर्वी एका मुलाखतीत, मल्लिकाने बीसीसीआयला लिलावाची जबाबदारी सोपवल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले, "भारतीय महिलांना अखेरीस आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे हक्क मिळतील, त्यांच्याकडे क्षमता असेल. उच्च स्तरावर खेळण्यासाठी ही लीग खूप अनुभव देऊन जाईल."







आयपीएल २०२४च्या लिलावाची प्रक्रियेला फार कमी दिवस शिल्लक आहेत. यासाठी सर्व फ्रँचायझींनी तयारी सुरू केली आहे. आयपीएलच्या बलाढ्य संघांपैकी एक मानल्या जाणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडे आक्रमक खेळाडू असूनही एकही विजेतेपद मिळवता आलेले नाही. यावेळी, आरसीबीची लिलावात दोन खेळाडूंवर नजर आहे. यावेळी ते विजेतेपदाचा दुष्काळ संपवतील अशी आशा त्यांना वाटते. आरसीबीकडे नेहमीच आक्रमक फलंदाज आहेत. विराट कोहली, ग्लेन मॅक्सवेल आणि फाफ डु प्लेसिस यांनी फ्रँचायझीसाठी अप्रतिम फलंदाजी केली आहे. जर आपण काही काळ मागे गेलं तर एबी डिव्हिलियर्स आणि ख्रिस गेलसारख्या आक्रमक फलंदाजांनीही आरसीबीसाठी मोठी धावसंख्या उभारली आहे. मात्र, आजपर्यंत या संघाला एकदाही ट्रॉफी जिंकता आलेली नाही. यामागे कमकुवत गोलंदाजी हेही कारण मानले जात आहे. आरसीबीने लिलावापूर्वी वेगवान गोलंदाज हर्षल पटेलला आधीच सोडले आहे, ज्याला त्यांनी पूर्ण १०.७५ कोटी रुपयांमध्ये समाविष्ट केले होते. हर्षल हा आयपीएलच्या इतिहासात एका षटकात सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज आहे. आयपीएल २०२१ मध्ये, त्याने सीएसकेच्या जडेजाला गोलंदाजी करताना आरसीबीसाठी ३७ धावा दिल्या. मात्र, त्यांनी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि रीस टॉपले यांना कायम ठेवले आहे. अशा परिस्थितीत यावेळी आयपीएल लिलावात आरसीबी संघात समतोल राखण्याचे ध्येय ठेवणार आहे. यंदाच्या आयपीएल लिलावासाठी एकूण ११६६ खेळाडूंनी नोंदणी केली आहे. या यादीत ८३० खेळाडूंसह भारतीयांचे वर्चस्व आहे, तर उर्वरित ३३६ विदेशी खेळाडू आहेत. मात्र, सर्व १० फ्रँचायझीकडे केवळ ७७ खेळाडू खरेदी करू शकतात एवढीच जागा शिल्लक आहे.

### पीकेएल लिलावातही दिसली होती

» स्पोर्ट्स लीगमधील खेळाडूंच्या लिलावासाठी मल्लिका अनोळखी नाही, तिने २०२१ मध्ये प्रो कबड्डीचा लिलावा दरम्यान लिलावकर्त्याची भूमिका पार पाडली होती. तिंच लिलावातील प्रवास २००१ मध्ये क्रिस्टीज या प्रसिद्ध ब्रिटिश लिलावामधून सुरू झाला होता. या वर्षाच्या सुरुवातीला डब्ल्यूपीएल लिलावापूर्वी एका मुलाखतीत, मल्लिकाने बीसीसीआयला लिलावाची जबाबदारी सोपवल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले, "भारतीय महिलांना अखेरीस आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे हक्क मिळतील, त्यांच्याकडे क्षमता असेल.

# आफ्रिका दौऱ्यापूर्वी सॅमसनने केली दावेदारी पक्की

## » सॅमसनने विजय हजारे ट्रॉफीत झळकावले शानदार शतक

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिका दौऱ्यापूर्वी विजय हजारे ट्रॉफीमध्ये संजू सॅमसनने दमदार कामगिरी केली होती. केरळकडून खेळताना त्याने रेल्वे संघाविरुद्ध १३९ चेंडूत १२८ धावांची नाबाद खेळी खेळली. मात्र, सॅमसनची ही खेळी व्यर्थ ठरली. आपल्या शतकी खेळीने केरळला तो विजयापर्यंत नेऊ शकला नाही आणि संघाला रेल्वेविरुद्ध १८ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला.**



बंगळुरू येथील किनी अँरेना स्पोर्ट्स ग्राऊंडवर झालेल्या विजय हजारे ट्रॉफी सामन्यात संजू सॅमसनने चमकदार कामगिरी केली आहे. रेल्वेसमोर २५५ धावांचा पाठलाग करताना संजू सॅमसनने केरळ संघासाठी कठीण काळात शतक झळकावले. १३९ चेंडूंचा सामना करताना सॅमसनने ६ षटकार आणि ८ चौकारांसह १३९ धावांची नाबाद खेळी खेळली. त्याने श्रेयस गोपालबरोबर चांगली भागीदारी केली, पण केरळ संघ ५० षटकात केवळ २३७/८ धावाच करू शकला. मात्र, संजू सॅमसनच्या या शानदार शतकी खेळीमुळे टीम इंडियात त्याची दावेदारी पक्की झाली आहे, असे म्हटले तर वावगं ठरणार नाही. दक्षिण आफ्रिका दौऱ्यात त्याला प्लेईंग-११मध्ये नक्कीच स्थान मिळू शकते. दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार एबी डिव्हिलियर्स म्हणाला की, "आफ्रिकेतील परिस्थिती त्यांना मदत करेल आणि त्यांच्यासाठी ही एक चांगली मालिका असावी." एबी डिव्हिलियर्सने त्याच्या यूट्यूब चॅनलवर आगामी भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका दौऱ्याबाबत सांगितले की, "संजू सॅमसनची निवड झाल्याचे पाहून खूप आनंद झाला. तो दक्षिण आफ्रिकेच्या खेळपट्टीवर चांगली मदत फलंदाजी करेल आणि इथल्या वातावरणाचा आनंद घेईल. जेव्हा तो फलंदाजी करतो तेव्हा तो बराच वेळ एक बाजू लावून धरतो. थोडी उसळी आणि स्विंग होत असलेल्या खेळपट्टीवर सर्व फलंदाजांची कसोटी लागणार आहे. मात्र, मला वाटते की संजू आणि त्याचे सहकारी चांगली कामगिरी करतील. सॅमसनची निवड झाल्याने संघात तुम्हाला विकेटकीपिंगचा अतिरिक्त पर्यायही मिळतो, ही टीम इंडियासाठी जमेची बाजू आहे. एकदिवसीय सामन्यांसाठी भारताचा संघ:ऋतुराज गायकवाड, साई सुदर्शन, तिलक वर्मा, रजत पाटीदार, रिंकू सिंग, श्रेयस अय्यर, के.एल. राहुल (कर्णधार/यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल, मुकेश कुमार, आवेश खान, अर्शदीप सिंग, दीपक चाहर

### ही टीम इंडियासाठी जमेची बाजू

» संजू सॅमसनच्या या शानदार शतकी खेळीमुळे टीम इंडियात त्याची दावेदारी पक्की झाली आहे, असे म्हटले तर वावगं ठरणार नाही. दक्षिण आफ्रिका दौऱ्यात त्याला प्लेईंग-११मध्ये नक्कीच स्थान मिळू शकते. दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार एबी डिव्हिलियर्स म्हणाला की, "आफ्रिकेतील परिस्थिती त्यांना मदत करेल आणि त्यांच्यासाठी ही एक चांगली मालिका असावी." एबी डिव्हिलियर्सने त्याच्या यूट्यूब चॅनलवर आगामी भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका दौऱ्याबाबत सांगितले की, "संजू सॅमसनची निवड झाल्याचे पाहून खूप आनंद झाला. तो दक्षिण आफ्रिकेच्या खेळपट्टीवर चांगली मदत फलंदाजी करेल आणि इथल्या वातावरणाचा आनंद घेईल. जेव्हा तो फलंदाजी करतो तेव्हा तो बराच वेळ एक बाजू लावून धरतो. थोडी उसळी आणि स्विंग होत असलेल्या खेळपट्टीवर सर्व फलंदाजांची कसोटी लागणार आहे. मात्र, मला वाटते की संजू आणि त्याचे सहकारी चांगली कामगिरी करतील. सॅमसनची निवड झाल्याने संघात तुम्हाला विकेटकीपिंगचा अतिरिक्त पर्यायही मिळतो, ही टीम इंडियासाठी जमेची बाजू आहे.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | TUESDAY, 6th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# A new platform for the creativity of students in Pimpri-Chinchwad

## Announcement of 'LPJ Innovation Awards-2024'; An initiative by Laxmanbhau Jagtap Arts-Sports Academy

**Pimpri : Representative**

**People's leader Laxmanbhau Jagtap had outlined his concept of 'Developed Pimpri-Chinchwad' and how the city should be! The Laxmanbhau Jagtap Kala and Sports Academy has announced 'LPJ Innovation Awards-2024' with the aim to involve the future generation in realizing the same ideal city of their dreams and to give a platform to the creativity of this new generation of students.**



BJP city president Shankar Jagtap has organized a ground-breaking competition which is designed to give scope to students' creativity. School students along with the students taking higher education can participate. Considering the structure of the topics in the competition, the concepts coming out through the same will surely contribute to sustainable development of the city.

The competition will be held in three categories. Sub-junior category for students of 7th to 9th class, junior category for students of 10th to 12th class and senior category for students pursuing graduation and post-graduation. Although the competition is for students, on this occasion, the concepts in the minds of parents and teachers can certainly be presented through the students. In a sense, the citizens of the entire city will get an opportunity to present the best concept to make their dream city a reality. this competition. Notably, the winners of the competition will be awarded individual and team prizes totaling Rs 7 lakh.\

Registration for the competition starts on 5th December 2023, the last date of registration will be 3rd January 2024. Evaluation of the said concepts by expert examiners will be held on 20th January 2024 and the final round of the competition will be held on 15 February 2024. To participate, submit the project on the website www.lpjfoundation.com and for more information contact the mobile number 8956002507/ 8956002508/ 8956002509.

All concepts presented in the competition will be given a certificate of participation. Ward-wise best concepts will be selected for the competition and necessary support will be provided to implement the best concepts that will help the development of the city and to get the 'patent' of this concept to the contestant.

### ...Invent and present your ideas on these topics!

1- Sustainable Smart City: It includes sub-themes of waste management, urban mobility, traffic, infrastructure, disaster preparedness, water management and conservation, public utilities and accessibility of services, inclusive service delivery (all sectors/gender). 2- Digitalization : Apps and Platforms, ICT (Information Communication and Technology), e-Governance, e-Citizen Service Delivery, Grievance Redressal, IMC Website, PCMC/Sarathi App are the sub-topics. 3- Environment: Pollution Control, Energy and Resources, Green Belts are subtopics for this. 4- Revenue : It has sub-topics like revenue source, cost, optimization. 5- Urban Health and Wellness: It has sub-themes of accessibility to healthcare, sanitation, mental health, mindfulness. 6- Culture and Heritage: Preservation and conservation of cultural heritage sites are sub-topics.

> The city of Pimpri-Chinchwad, reputed as an industrial city, should be known as a city of great concepts and creativity in the future. 'LPJ Innovation Awards-2024' has been announced aiming at this goal. Students from all the schools and colleges of the city should participate in this competition in large numbers. In future, the creative contribution of citizens and students will be important in the sustainable development of the city. We strongly believe that such efforts will undoubtedly help to raise the lifestyle of the city dwellers.
>
> **-Shankar Jagtap,** City President, BJP, Pimpri-Chinchwad

